Uday Samant @samant_uday · Aug 18

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिकशास्त्र विभागात संरक्षण मंत्रालयाकडून 'चेअर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही 'चेअर ऑफ एक्सलन्स' मिळवणारा संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग हा भारतातील एकमेव विभाग असून याबद्दल विद्यापीठाचे अभिनंदन व शुभेच्छा!

23 16 412

पुढारी

# विद्यापीठाच्या संरक्षण विभागाला 'चेअर ऑफ एक्सलन्स'

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिक शास्त्र विभागात केंद्र सरकारच्या संरक्षण मंत्रालयाकडून 'चेअर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी दोन कोटी रुपयांच्या निधीचीही तरतूद करण्यात



## दोन कोटी रुपयांची आर्थिक तरतूद

आली आहे. हा मान मिळविणारा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संरक्षण व सामरिक शास्त्र विभाग हा भारतातील एकमेव विभाग आहे. संरक्षण मंत्रालयाने लष्करी इतिहास व सध्याच्या राष्ट्रीय सुरक्षेबाबत सर्वसामान्य जनतेस माहिती मिळावी तसेच लष्कराचे धोरण, राष्ट्रीय सुरक्षेसंबंधीची आव्हाने, युद्धविषयक नीती, याबाबत राष्ट्रीय पातळीवर अभ्यास व्हावा, त्याचा प्रचार आणि प्रसार व्हावा, यासाठी भारतभरातील विद्यापीठांकडून प्रस्ताव मागविले होते. यासाठी १०० विद्यापीठांकडून अर्ज करण्यात आले होते. या सर्व प्रस्तावांतून संरक्षण व सामरिक शास्त्र विभाग व विद्यापीठाची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कामगिरी लक्षात घेता पुणे विद्यापीठात 'चेअर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्याचा निर्णय संरक्षण मंत्रालयाने घेतला.

याआधी संरक्षण व सामरिक शास्त्र विभागात भारतीय भूसेनेद्वारे १९९४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावे, तसेच भारतीय वायुसेनेद्वारे फेब्रुवारी २०२० मध्ये 'मार्शल ऑफ द एअर फोर्स अर्जन सिंग' यांच्या नावे 'चेअर ऑफ

> भूसेना, वायुसेना व संरक्षण मंत्रालय यांच्या समन्वयाने 'चेअर ऑफ एक्सलन्स'ची स्थापना करणारा संरक्षण व सामरिक शास्त्र विभाग हा देशातील एकमेव विभाग आहे. पुढील काळात भारतीय नौसेनेसोबतही 'चेअर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्याचा आमचा मानस असून, यासाठीचा प्रस्तावही नौसेना मुख्यालयात पाठविला आहे.
>
> - **डॉ. विजय खरे**, विभागप्रमुख, संरक्षण व सामरिक शास्त्र विभाग

> संरक्षण मंत्रालयाद्वारे विभागाला 'चेअर ऑफ एक्सलन्स' मिळाल्याबद्दल अत्यंत आनंद आहे. विद्यार्थ्यांना यामुळे या विषयांमध्ये संशोधन करण्याची संधी निर्माण झाली आहे.
>
> - **डॉ. नितीन करमळकर**, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकमत

# विद्यापीठाच्या संरक्षण, सामरिकशास्त्र विभागाचा केंद्राकडून सन्मान

## दोन कोटी रुपयांची आर्थिक तरतूद: चार ‘चेअर ऑफ एक्सलेन्स‘ मिळवणारा भारतातील एकमेव विभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षण व समरिकशास्त्र विभागात भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाकडून "चेअर ऑफ एक्सेलेन्स" स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी दोन कोटी रुपयांच्या निधीचीही तरतूद करण्यात आली आहे. ही "चेअर ऑफ एक्सलेन्स" मिळवणारा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग हा भारतातील एकमेव विभाग आहे.

> संरक्षण व समरिकशास्त्र विभाग हा देशातील एकमेव विभाग आहे. ज्यामध्ये भू सैना, वायू सैना व संरक्षण मंत्रालय यांच्या समन्वयाने "चेअर ऑफ एक्सेलेन्स" ची स्थापना करण्यात आली आहे. पुढील काळात भारतीय नौसेनेसोबतही "चेअर ऑफ एक्सेलेन्स" स्थापन करण्याचा आमचा मानस असून यासाठीचा प्रस्तावही नौसेना मुख्यालयात पाठविला आहे.
>
> **- डॉ. विजय खरे, विभाग प्रमुख, संरक्षण व समरिकशास्त्र विभाग**

> संरक्षण मंत्रालयाद्वारे विभागाला "चेअर ऑफ एक्सलेन्स" मिळाल्याबद्दल अत्यंत आनंद आहे. विद्यार्थ्यांना यामुळे या विषयांमध्ये संशोधन करण्याची संधी निर्माण झाली आहे.
>
> **- प्रा. डॉ. नितीन करमळकर, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाने लष्करी इतिहास व सध्याच्या राष्ट्रीय सुरक्षेबाबत सर्वसामान्य जनतेस माहिती मिळावी. तसेच लष्कराचे धोरण, राष्ट्रीय सुरक्षेसबंधीची आव्हाने, युद्धविषयक नीती याबाबत राष्ट्रीय पातळीवर अभ्यास व्हावा, त्याचा प्रचार व्हावा यासाठी भारतभरातील विद्यापीठाकडून प्रस्ताव मागविण्यात आले. यासाठी १०० विद्यापीठाकडून अर्ज करण्यात आले. या सर्व प्रस्तावातून संरक्षण व समरिकशास्त्र विभाग व विद्यापीठाची राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय कामगिरी लक्षात घेता पुणे विद्यापीठात "चेअर ऑफ एक्सेलेन्स" स्थापन करण्याचा निर्णय संरक्षण मंत्रालयाने घेतला आहे. याआधी संरक्षण व समरिकशास्त्र विभागमध्ये भारतीय भुसेनेद्वारे १९९४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावे तसेच भारतीय वायुसेनेद्वारे फेब्रुवारी २०२० मध्ये "मार्शल ऑफ द एअर फोर्स अर्जन सिंग" यांच्या नावे "चेअर ऑफ एक्सेलेन्स" मिळाले आहे.

कुलगुरु प्रा.डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरु डॉ. एन.एस.उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, विभागप्रमुख डॉ. विजय खरे यांनी आनंद व्यक्त केला आहे.

सामना

# संरक्षणशास्त्र विभागाला स्वतंत्र 'चेअर ऑफ एक्सलन्स'



- चार 'चेअर ऑफ एक्सलन्स' मिळविणारा देशातील एकमेव विभाग
- दोन कोटी रुपयांची तरतूद

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिकशास्त्र विभागात केंद्र सरकारच्या संरक्षण मंत्रालयाकडून 'चेअर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी दोन कोटी रुपयांच्या निधीचीही तरतूद करण्यात आली आहे. चारही 'चेअर ऑफ एक्सलन्स' मिळविणारा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग हा देशातील एकमेव विभाग आहे.

केंद्र सरकारच्या संरक्षण मंत्रालयाने लष्करी इतिहास व सध्याच्या राष्ट्रीय सुरक्षेबाबत सर्वसामान्य जनतेस माहिती मिळावी, तसेच लष्कराचे धोरण, राष्ट्रीय सुरक्षेसंबंधीची आव्हाने, युद्धविषयक नीती याबाबत राष्ट्रीय पातळीवर अभ्यास व्हावा, त्याचा प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी हिंदुस्थानातील विद्यापीठांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. यासाठी १०० विद्यापीठांकडून अर्ज करण्यात आले होते. या सर्व प्रस्तावांतून संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग व विद्यापीठाची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कामगिरी लक्षात घेता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'चेअर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्याचा निर्णय संरक्षण मंत्रालयाने घेतला आहे.

याआधी संरक्षण व सामरिकशास्त्र विभागामध्ये हिंदुस्थानी भूसेनेद्वारे १९९४मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावे, तसेच हिंदुस्थानी वायुसेनेद्वारे फेब्रुवारी २०२०मध्ये 'मार्शल ऑफ द एअर फोर्स अर्जन सिंग' यांच्या नावे 'चेअर ऑफ एक्सलन्स' मिळाले आहे. बदलत्या भू-राजनैतिक, भू-राजकीय पद्धतींचा विचार करता, विभागाने नवीन पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम, पाच वर्षांचा एकात्मिक अभ्यासक्रम यांसह नवीन उपक्रम राबविले जात आहेत.

"संरक्षण मंत्रालयाद्वारे विभागाला 'चेअर ऑफ एक्सलेन्स' मिळाल्याबद्दल अत्यंत आनंद आहे. विद्यार्थ्यांना यामुळे या विषयांमध्ये संशोधन करण्याची संधी निर्माण झाली आहे.

**- प्रा. डॉ. नितीन करमळकर,**
कुलगुरू, पुणे विद्यापीठ

"संरक्षण व समरिकशास्त्र विभाग हा देशातील एकमेव विभाग आहे भू सेना, वायू सेना व संरक्षण मंत्रालयांच्या समन्वयाने 'चेअर ऑफ एक्सेलेन्स' ची स्थापना केली. पुढील काळात नौसेनेसोबतही 'चेअर ऑफ एक्सेलेन्स' स्थापन करण्याचा मानस आहे.

**- डॉ. विजय खरे,**
विभागप्रमुख, संरक्षण व समरिकशास्त्र विभाग.

Pune Edition
Aug 18, 2021 Page No. 10
Powered by : eReleGo.com

# विद्यापीठात ‘चेअर ऑफ एक्सलन्स’

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १७** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिकशास्त्र विभागात भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाकडून ‘चेअर ऑफ एक्सलन्स’ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी दोन कोटी रुपयांच्या निधीचीही तरतूद केली आहे. ही ‘चेअर ऑफ एक्सलन्स’ मिळवणारा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग हा भारतातील एकमेव विभाग आहे.

भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाने लष्करी इतिहास व



सध्याच्या राष्ट्रीय सुरक्षेबाबत सर्वसामान्य जनतेस माहिती मिळावी. तसेच लष्कराचे धोरण, राष्ट्रीय सुरक्षेसंबंधिची आव्हाने, युद्धविषयक नीती याबाबत राष्ट्रीय पातळीवर अभ्यास व्हावा, त्याचा प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी देशभरातील विद्यापीठांकडून प्रस्ताव मागवले होते. यासाठी १०० विद्यापीठांकडून अर्ज केले होते. या सर्व प्रस्तावांतून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कामगिरी लक्षात घेता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संरक्षण व सामरिकशास्त्र विभागास ‘चेअर ऑफ एक्सलन्स’ स्थापन करण्याचा निर्णय संरक्षण मंत्रालयाने घेतला आहे. यापूर्वी संरक्षण व सामरिकशास्त्र विभागामध्ये भारतीय भूसेनेद्वारे १९९४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावे तसेच भारतीय वायुसेनेद्वारे फेब्रुवारी २०20 मध्ये ‘मार्शल ऑफ द एअर फोर्स अर्जन सिंग’ यांच्या नावे ‘चेअर ऑफ एक्सेलन्स’ मिळाले आहे. दरम्यान, संरक्षण मंत्रालयाद्वारे विभागाला ‘चेअर ऑफ एक्सलेन्स’ मिळाल्यामुळे या विषयात विद्यार्थ्यांना संशोधन करण्याची संधी निर्माण झाली आहे, असे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी म्हटले आहे.

> “ विद्यापीठातील संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग हा देशातील एकमेव विभाग आहे. ज्यामध्ये भू-सेना, वायू सेना व संरक्षण मंत्रालय यांच्या समन्वयाने ‘चेअर ऑफ एक्सलेन्स’ची स्थापना केली आहे. पुढील काळात भारतीय नौसेनेसोबतही ‘चेअर ऑफ एक्सलन्स’ स्थापन करण्याचा आमचा मानस असून यासाठीचा प्रस्तावही नौसेना मुख्यालयात पाठविला आहे.
>
> **- डॉ. विजय खरे,** विभागप्रमुख, संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग

# पुणे विद्यापीठात 'चेअर ऑफ एक्सलन्स'

## संरक्षण मंत्रालयाचा निर्णय; दोन कोटी रुपयांच्या निधीचीही तरतूद

**प्रतिनिधी** | पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिकशास्त्र विभागात संरक्षण मंत्रालयाकडून 'चेअर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी दोन कोटी रुपयांच्या निधीचीही तरतूद करण्यात आली आहे. ही 'चेअर ऑफ एक्सलन्स' मिळवणारा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग हा भारतातील एकमेव विभाग आहे.

संरक्षण मंत्रालयाने लष्करी इतिहास व सध्याच्या राष्ट्रीय सुरक्षेबाबत लोकांना माहिती मिळावी तसेच लष्कराचे धोरण, राष्ट्रीय सुरक्षेसबंधीची आव्हाने, युद्धविषयक नीती याबाबत राष्ट्रीय पातळीवर अभ्यास व्हावा, त्याचा प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी भारतभरातील विद्यापीठांकडून प्रस्ताव मागवण्यात आले होते. यासाठी १०० विद्यापीठांकडून अर्ज करण्यात आले होते. या प्रस्तावांतून संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग व विद्यापीठाची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कामगिरी लक्षात घेता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

याआधी संरक्षण व सामरिकशास्त्र विभागात भारतीय भूसेनेद्वारे १९९४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावे तसेच भारतीय वायुसेनेद्वारे फेब्रुवारी २०२० मध्ये 'मार्शल ऑफ द एअर फोर्स अर्जुन सिंग' यांच्या नावे 'चेअर ऑफ एक्सलन्स' मिळाले आहे.

बदलत्या भू-राजनैतिक, भू-राजकीय पद्धतीचा विचार करता विभागाने नवीन पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम, पाच वर्षांचा एकात्मिक अभ्यासक्रम यांसह नवीन उपक्रम राबवले जात आहेत. संरक्षण मंत्रालयाद्वारे प्रतिष्ठेचे 'चेअर ऑफ एक्सलन्स' मिळाल्याबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन.एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, विभागप्रमुख डॉ. विजय खरे यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# पुणे विद्यापीठात ‘चेअर ऑफ एक्सलन्स’

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** केंद्र सरकारच्या संरक्षण मंत्रालयाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संरक्षण व सामरिकशास्त्र विभागामध्ये चेअर ऑफ एक्सलन्स स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी दोन कोटींच्या निधींची तरतूद करण्यात आली असून, ही चेअर ऑफ एक्सलन्स मिळवणारा संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग भारतातील एकमेव विभाग ठरला आहे.

लष्करी इतिहास आणि सध्याच्या राष्ट्रीय सुरक्षेबाबत सर्वसामान्य जनतेला माहिती मिळण्यासाठी, लष्कराचे धोरण, राष्ट्रीय सुरक्षेसंदर्भातील आव्हाने, युद्धविषयक नीती याबाबत राष्ट्रीय पातळीवर अभ्यास होण्यासह त्याच्या प्रचार, प्रसारासाठी संरक्षण मंत्रालयाने देशभरातील विद्यापीठांकडून प्रस्ताव मागवले होते.

त्यानुसार देशभरातील शंभर विद्यापीठांनी प्रस्ताव सादर केले. त्यातून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि विद्यापीठाच्या संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागाची कामगिरी लक्षात घेऊन मंत्रालयातर्फे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची निवड करण्यात आली. या चेअर ऑफ एक्सलन्सद्वारे संशोधनाची संधी उपलब्ध होणार आहे.

> “ भूसेना, वायुसेना आणि संरक्षण मंत्रालयाद्वारे चेअर ऑफ एक्सलन्स स्थापन झालेला संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग हा देशातील एकमेव आहे. येत्या काळात भारतीय नौसेनेसह चेअर ऑफ एक्सलन्स स्थापन करण्याचा मनोदय आहे. त्यासाठी प्रस्तावही नौसेना मुख्यालयाला देण्यात आला आहे.
>
> – डॉ. विजय खरे, विभागप्रमुख, संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग

> संरक्षण मंत्रालयाद्वारे विद्यापीठातील संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागाला चेअर ऑफ एक्सलन्स मिळाल्याचा आनंद आहे. विद्यार्थ्यांना या विषयांमध्ये संशोधन करण्याची संधी निर्माण झाली आहे.
>
> – डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सकाळ गुरुवार, १९ ऑगस्ट २०२१

# विद्यापीठात 'चेअर ऑफ एक्सलन्स'

## संरक्षण आणि लष्करासंबंधी अभ्यास

**पुणे, ता. १८ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिकशास्त्र विभागात संरक्षण मंत्रालयाकडून 'चेअर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या अध्यासनासाठी दोन कोटी रुपयांच्या निधीचीही तरतूद केली आहे. ही 'चेअर ऑफ एक्सलन्स' मिळवणारा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग हा भारतातील एकमेव आहे.

देशभरातील विद्यापीठांकडून लष्कराने चेअर ऑफ एक्सलन्ससंबंधी प्रस्ताव मागविले होते. यासाठी १०० विद्यापीठांनी अर्ज केले होते. या सर्व प्रस्तावांतून विद्यापीठातील संरक्षण व सामरिकशास्त्र विभागाची कामगिरी लक्षात घेता हे अध्यासन येथे स्थापन करण्याचा निर्णय संरक्षण मंत्रालयाने घेतला आहे.

याआधी संरक्षण व सामरिकशास्त्र विभागामध्ये भारतीय भूसेनेद्वारे १९९४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावे तसेच भारतीय वायुसेनेद्वारे फेब्रुवारी २०२० मध्ये 'मार्शल ऑफ द एअर फोर्स अर्जन सिंग' यांच्या नावे 'चेअर ऑफ एक्सलन्स' मिळाले आहे. बदलत्या भू-राजनैतिक, भू-राजकीय पद्धतीचा विचार करता विभागाकडून नवीन पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम, पाच वर्षांचा एकात्मिक अभ्यासक्रम यांसह नवीन उपक्रम राबविले जात आहेत.

**"संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग हा देशातील एकमेव विभाग आहे, ज्यामध्ये भूसेना, वायुसेना व संरक्षण मंत्रालय यांच्या समन्वयाने 'चेअर ऑफ एक्सलन्स'ची स्थापना केली आहे. पुढील काळात भारतीय नौसेनेसोबतही 'चेअर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्याचा आमचा मानस असून, यासाठीचा प्रस्तावही नौसेना मुख्यालयात पाठविला आहे.**

**- डॉ. विजय खरे,**

विभागप्रमुख, संरक्षण व सामरिकशास्त्र

**"संरक्षण मंत्रालयाद्वारे विभागाला 'चेअर ऑफ एक्सलन्स' मिळाल्याबद्दल अत्यंत आनंद होत आहे. यामुळे विद्यार्थ्यांना या विषयांमध्ये संशोधन करण्याची संधी निर्माण झाली आहे.**

**- डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू**

### अध्यासनाचा उद्देश...

- लष्करी इतिहास आणि सध्याच्या राष्ट्रीय सुरक्षेबाबत सर्वसामान्यांना माहिती मिळावी
- लष्कराचे धोरण, राष्ट्रीय सुरक्षेसंबंधीची आव्हाने, युद्धविषयक नीती यांबाबत राष्ट्रीय पातळीवर अभ्यास व्हावा
- यासंबंधीचा प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी
- विद्यार्थ्यांना संरक्षण आणि लष्करासंबंधीच्या संशोधनाला वाव मिळण्यासाठी



पिछले 50 साल से लगातार प्रकाशित पुणे का एकमात्र हिंदी दैनिक
आज का आनंद
खुद बदलो ! दुनिया बदल जायेगी...
Mumbai | 19-08-2021 | Page- 6
aajkaanand.epapers.in

# पुणे यूनिवर्सिटी में रक्षा मंत्रालय का 'चेयर ऑफ एक्सीलेंस' बनाने हेतु 2 करोड़ का फंड

**पुणे, 18 अगस्त (आ.प्र.)**

सावित्रीबाई फुले पुणे यूनिवर्सिटी के डिफेंस और स्ट्रैटेजिक विभाग में केंद्र सरकार के रक्षा मंत्रालय द्वारा चेयर ऑफ एक्सीलेंस की स्थापना का निर्णय लिया गया है. इसके लिए 2 करोड़ के फंड का प्रावधान किया गया है. यह सम्मान पाने वाला देश का एकमात्र विभाग या यूनिवर्सिटी है. केंद्रीय रक्षा मंत्रालय ने, सेना के इतिहास और मौजूदा राष्ट्रीय सुरक्षा को लेकर आम नागरिकों को जानकारी मिले और सेना की पॉलिसी, राष्ट्रीय सुरक्षा संबंधी चुनौतियों, युद्ध संबंधी नीति की राष्ट्रीय स्तर पर स्टडी हो और उसके प्रचार और प्रसार के उद्देश्य से देशभर की यूनिवर्सिटीज से प्रस्ताव मंगाए थे. इसके लिए 100 यूनिवर्सिटीज ने आवेदन किया था. इन सभी प्रस्तावों से डिफेंस और स्ट्रैटेजिक विभाग व यूनिवर्सिटी के राष्ट्रीय व अंतर्राष्ट्रीय कार्यों को ध्यान में रखते हुए पुणे यूनिवर्सिटी में चेयर ऑफ एक्सीलेंस की स्थापना करने का निर्णय रक्षा मंत्रालय ने लिया है. इससे पहले रक्षा व सामरिक शास्त्र विभाग को भारतीय थल सेना द्वारा 1994 में छत्रपति शिवाजी महाराज के नाम और भारतीय वायुसेना द्वारा फरवरी 2020 में मार्शल ऑफ द एयर फोर्स अर्जनसिंह चेयर ऑफ एक्सीलेंस बनाने का सम्मान मिल चुका है.

Powered by Bharati Web Pvt Ltd

पुण्य नगरी गुरुवार, १९ ऑगस्ट २०२१

# संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागाला 'चेअर ऑफ एक्सेलेन्स'

## दोन कोटींच्या निधीची तरतूद : पुणे विद्यापीठातील संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग देशातील एकमेव विभाग

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिकशास्त्र विभागात भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाकडून 'चेअर ऑफ एक्सेलेन्स' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी दोन कोटी रुपयांच्या निधीचीही तरतूद केली आहे. ही 'चेअर ऑफ एक्सेलेन्स' मिळवणारा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग हा भारतातील एकमेव विभाग आहे.

भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाने लष्करी इतिहास व सध्याच्या राष्ट्रीय सुरक्षेबाबत सर्वसामान्य जनतेस माहिती मिळावी तसेच लष्कराचे धोरण, राष्ट्रीय सुरक्षेसंबंधीची आव्हाने, युद्धविषयक नीती याबाबत राष्ट्रीय पातळीवर अभ्यास व्हावा, त्याचा प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी भारतभरातील विद्यापीठाकडून प्रस्ताव मागविले होते. यासाठी १०० विद्यापीठांकडून अर्ज केले होते. या सर्व प्रस्तावांतून संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग व विद्यापीठाची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कामगिरी लक्षात घेता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'चेअर ऑफ एक्सेलेन्स' स्थापन करण्याचा निर्णय संरक्षण मंत्रालयाने घेतला आहे.

याआधी संरक्षण व सामरिकशास्त्र विभागामध्ये भारतीय भूसेनेद्वारे १९९४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावे तसेच भारतीय वायुसेनेद्वारे फेब्रुवारी २०२० मध्ये 'मार्शल ऑफ द एअर फोर्स अर्जन सिंग' यांच्या नावे 'चेअर ऑफ एक्सेलेन्स' मिळाले आहे. बदलत्या भू-राजनैतिक, भू-राजकीय पद्धतीचा विचार करता विभागाने नवीन पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम, पाच वर्षांचा एकात्मिक अभ्यासक्रम यांसह नवीन उपक्रम राबविले जात आहेत. संरक्षण मंत्रालयाद्वारे प्रतिष्ठेची 'चेअर ऑफ एक्सलन्स' मिळाल्याबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, विभागप्रमुख डॉ. विजय खरे यांनी समाधान व्यक्त केले आहे.

> संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग हा देशातील एकमेव विभाग आहे ज्यामध्ये भू सेना, वायू सेना व संरक्षण मंत्रालय यांच्या समन्वयाने 'चेअर ऑफ एक्सेलेन्स'ची स्थापना करण्यात आली आहे. पुढील काळात भारतीय नौसेनेसोबतही 'चेअर ऑफ एक्सेलेन्स' स्थापन करण्याचा आमचा मानस असून यासाठीचा प्रस्तावही नौसेना मुख्यालयात पाठविला आहे.
>
> – **डॉ. विजय खरे,** विभागप्रमुख,
> संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग

> संरक्षण मंत्रालयाद्वारे विभागाला 'चेअर ऑफ एक्सेलेन्स' मिळाल्याबद्दल अत्यंत आनंद आहे. विद्यार्थ्यांना यामुळे या विषयांमध्ये संशोधन करण्याची संधी निर्माण झाली आहे.
>
> – **प्रा. डॉ. नितीन करमळकर,**
> कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

महाराष्ट्र टाइम्स । पुणे । गुरुवार, १९ ऑगस्ट २०२१

# सामरिकशास्त्र विभागात 'चेअर ऑफ एक्सलन्स'

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिकशास्त्र विभागात संरक्षण मंत्रालयाकडून 'चेअर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी दोन कोटी रुपयांच्या निधीचीही तरतूद करण्यात आली आहे. ही 'चेअर ऑफ एक्सलन्स' मिळवणारा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग हा भारतातील एकमेव विभाग ठरला आहे.

भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाने लष्करी इतिहास व सध्याच्या राष्ट्रीय सुरक्षेबाबत सर्वसामान्य जनतेस माहिती मिळावी; तसेच लष्कराचे धोरण, राष्ट्रीय सुरक्षेसंबंधीची आव्हाने, युद्धविषयक धोरण याबाबत राष्ट्रीय पातळीवर अभ्यास व्हावा, त्याचा प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी भारतभरातील विद्यापीठांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. यासाठी १०० विद्यापीठांकडून अर्ज करण्यात आले होते. या सर्व प्रस्तावांतून संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग व विद्यापीठाची राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय कामगिरी लक्षात घेता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'चेअर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्याचा निर्णय संरक्षण मंत्रालयाने घेतला आहे. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन.एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, विभागप्रमुख डॉ. विजय खरे यांनी 'चेअर ऑफ एक्सलन्स' मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

'संरक्षण मंत्रालयाच्या समन्वयाने 'चेअर ऑफ एक्सलन्स'ची स्थापना करण्यात आलेला संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग हा देशातील एकमेव विभाग ठरला आहे. पुढील काळात भारतीय नौदलासोबतही 'चेअर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्याचा मानस असून, यासाठीचा प्रस्तावही पाठविला आहे,' असे डॉ. विजय खरे यांनी सांगितले.

> **“ संरक्षण मंत्रालयाद्वारे विभागाला 'चेअर ऑफ एक्सलन्स' मिळाल्याबद्दल आनंद आहे. विद्यार्थ्यांना यामुळे या विषयामध्ये संशोधन करण्याची संधी निर्माण झाली आहे.**
>
> – डॉ. नितीन करमळकर,
> कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# SPPU to launch postgrad diploma in defence tech

Sandip.Dighe
@timesgroup.com

**Pune:** The Savitribai Phule Pune Unviersity's (SPPU) department of defence and strategic studies will sign an MoU with the Pune branch of the Institute of Defence Scientists and Technologists to launch a year-long postgraduate diploma course in defence technology from October.

A date for the signing will be announced shortly.

The course, is aimed at developing skilled workforce in defence technology and secure better interaction with Defence Research and Development Organisation's (DRDO) scienctists and industry persons.

Head of SPPU's department of defence and strategic studies Vijay Khare told **TOI**, "The course is likely to commence from the first week of October with an intake of 40 students, who will be admitted via an entrance exam. Engineering and science graduates will be eligible for the PG diploma course. The course will be spread over two semesters and will have theory and practical components."

"The IDST will take care of the scientific aspects of defence research and technology and lectures and practicals related to the same while the SPPU department will cover teaching of the strategic affairs," Khare said.

## 2-SEMESTER COURSE

"The course syllabus has been approved by the competent university bodies," he added.

"Students will get the opportunity to visit DRDO laboratories to get a first-hand experience of their work and research," Khare further said.

# पुणे विद्यापीठाचा सन्मान

## ‘चेअर ऑफ एक्सलन्स’ होणार स्थापन; शंभर विद्यापीठांतून निवड

**म. टा. प्रतिनिधी, नाशिक**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिकशास्त्र विभागात संरक्षण मंत्रालयाकडून ‘चेअर ऑफ एक्सलन्स’ स्थापन करण्यात येणार आहे. त्यासाठी दोन कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली असून, ‘चेअर ऑफ एक्सलन्स’ मिळविणारा पुणे विद्यापीठातील हा विभाग भारतातील एकमेव ठरला आहे.

लष्करी इतिहास व राष्ट्रीय सुरक्षेबाबत सर्वसामान्य जनतेस माहिती मिळावी, तसेच लष्कराचे धोरण, राष्ट्रीय सुरक्षेसंबंधीची आव्हाने, युद्धविषयक नीती याबाबत राष्ट्रीय पातळीवर अभ्यास व्हावा, त्याचा प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी संरक्षण मंत्रालयामार्फत देशभरातील विद्यापीठांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. शंभर विद्यापीठांकडून अर्ज करण्यात आले होते. या सर्व प्रस्तावांतून संरक्षण व



सामरिकशास्त्र विभाग व विद्यापीठाची राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय कामगिरी लक्षात घेऊन पुणे विद्यापीठात ‘चेअर ऑफ एक्सलन्स’ स्थापन करण्याचा निर्णय संरक्षण मंत्रालयाने घेतल्याचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, विभागप्रमुख डॉ. विजय खरे यांनी जाहीर केले आहे. पुढील काळात भारतीय नौदलासोबतही ‘चेअर ऑफ एक्सलन्स’ स्थापन करण्याचा मानस असल्याचे डॉ. विजय खरे यांनी सांगितले. संरक्षण मंत्रालयाद्वारे विभागाला ‘चेअर ऑफ एक्सलन्स’ मिळाल्याने विद्यार्थ्यांना या विषयामध्ये संशोधन करण्याची संधी निर्माण झाल्याचे मत कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी व्यक्त केले.



## ‘बीवायके’ला क्वालिटी एक्सलन्स अवॉर्ड

**नाशिक :** गोखले एज्युकेशन सोसायटीच्या बी. वाय. के. कॉमर्स कॉलेजला इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट, नवी दिल्ली या संस्थेतर्फे नुकतेच ‘क्वालिटी एक्सलन्स-२०२१’ अवॉर्ड प्रदान करण्यात आले. बडोदा येथे झालेल्या या समारंभात प्राचार्य डॉ. राम कुलकर्णी यांनी हे अवॉर्ड स्वीकारल्याची माहिती कॉलेजतर्फे देण्यात आली. विद्यार्थी आणि कॉमर्स क्षेत्राची गरज लक्षात घेत कॉलेजने राबविलेल्या विविध उपक्रमांची दखल घेऊन महाविद्यालयास हे अवॉर्ड देण्यात आल्याचे प्राचार्य डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले. व्यक्तिगत गटातून महाविद्यालयाच्या समन्वयक डॉ. लीना भट यांना ‘क्वालिटी अवॉर्ड’ प्राप्त झाले. या सन्मानाबद्दल गोखले एज्युकेशन सोसायटीचे सचिव डॉ. मो. स. गोसावी व संस्थेच्या एच. आर. डायरेक्टर डॉ. दीप्ती देशपांडे यांनी समाधान व्यक्त केले आहे. उपप्राचार्य डॉ. कायंदेपाटील, उपप्राचार्य डॉ. प्रसाद कुलकर्णी, गिरीश नातू, प्रवीण मुळे उपस्थित होते.